FORM 1A 0058155 N.C.R.B. I.I.F.-I

# पहिली खबर

# FIRST INFORMATION REPORT

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये ( Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य महाराष्ट्र जिल्हा मुंबई पोलीस ठाणे लाप्रवि पहिली खबर क्र. 07/24 वर्ष 2024 दिनांक 28/02/2024
State District Police Station FIR No. Year Date

2. (i) अधिनियम Act भ्र. प्र. अधि (सुधारित) 1988 कलमे Sections 7, 13(1)(अ) सह 13(2)
(ii) अधिनियम Act ______ कलमे Sections 120(ब), 406, 409, 465, 467, 468, 420, 471
(iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ______

3. (a) अपराधाची घटना : वार ______ तारीख पासून ऑक्टोबर 2021 ते मार्च 2022 दरम्यान वेळ ______ तारीख पर्यंत ______ वेळ ______
Occurrence of offence : Day Date from Time Date to Time
वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा) (Tick applicable portion)
(1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
(6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (5) 18.00 ते 06.00
(b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची तारीख 23/10/2023 वेळ ______
Information received at P. S. Date Time
(c) गुन्हा दाखल झालेला सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. 15/24 तारीख 28/02/2024 वेळ 14:30
General Diary Reference : Entry No. Date Time

4. माहितीचा प्रकार Type of Information : द्खलपात्र लेखी / तोंडी Written / Oral लेखी

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा दक्षिणेस 12 किमी चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. ______
Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S. Chouki / Beat / O.P. Name and No.
(b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव सीएसटी भवन, लालबाग, मुंबई ठिकाणीचे नंबर ______ गल्ली ______ रस्त्याचे नाव ______
Address of Occurrence Name No. if any Ward Name of road
जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण ______ गाव ______ पोस्ट ______ तालुका ______ जिल्हा ______ राज्य ______
Nearest identifiable place Village Post Taluka Dist. State
(c) पोलीस ठाण्याचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे.चे नाव ______ तालुका ______ जिल्हा ______ राज्य ______
In case, outside the limit of this Police Station Taluka Dist. State

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address
(a) नाव श्री. संजय रावसाहेब टेकाडे (b) वडिलांचे / पतीचे नाव रावसाहेब टेकाडे
Name Father's / Husband's Name
(c) जन्म तारीख व वय 52 वर्षे (d) राष्ट्रीयत्व भारतीय फोन नं. 7517787651
Date of Birth and Age Nationality Phone No.
(e) पारपत्र क्रमांक ______ दिल्याचा दिनांक ______ दिल्याचे ठिकाण ______ (f) व्यवसाय ______
Passport No. Date of Issue Place of Issue Occupation
(g) धर्म Religion ______ जात Caste ______ जनजात Sub-Caste ______
(h) पत्ता सिल्वर कोस्ट को.ऑ.हौ.सो. गल्ली ______ घर / नाव नं. डी/1304 फोन / मो. नं. ______ पॅन नं. ______ वोटर्स नं. ______
Address : Ward House/Name No. Phone/M. No. PAN No. Card No.
रस्त्याचे नाव प्लॉट न. 27 जवळचे प्रसिद्ध ठिकाण सेक्टर 15 गाव कोपरखैरणे पोस्ट नवी मुंबई पो. स्टे. ______
Road Nearest identifiable place Village Post P. Stn.
तालुका ______ जिल्हा ______ राज्य ______ सध्याचा पत्ता ______
Taluka Dist. State Present Address

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर लिहावे किंवा प्र. ख. 1-B केस डायरीला जोडावे.)
Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to case diary.)

अमित गिरीधर लाकडे, वय-४४ वर्षे, धंदा-नोकरी (विक्रीकर अधिकारी) नेमणूक तात्कालीन, जी.एस.टी. भवन, माझगाव, मुंबई व इतर 16 ट्रेडर्स व्यापाऱ्यांशी संबंधित व्यक्ती.



Scanned with OKEN Scanner

प्रथम खबर

तक्रारदार श्री. संजय रावसाहेब शेकाडे, वि. ५२ वर्षे, धंदा-
नोकरी (सहाय्यक विक्रीकर आयुक्त, जी.एस.टी. भवन, माझगांव,
मुंबई) यांचा स्वतंत्र्य कागदावर हस्तलिखीत केलेला जबाब
हीच गुन्ह्याची प्रथम खबर संबोधण्यात येते आहे.

समक्ष

(मानसिंग वयकल)
पोलीस निरिक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग
मुंबई

सहाय्यक राज्यकर आयुक्त
कार्यालय प्रमुख
सिमा तपासणी नाके
नोडल विभाग-११, मुंबई.

Scanned with OKEN Scanner

जबाब                                                                 दिनांक २८/०२/२०२४.

श्री संजय रावसाहेब टेकाडे, हिं/५२ वर्षे, धंदा:- नोकरी (सहाय्यक विक्रीकर आयुक्त, इ -००१, कार्यालय प्रमुख, नोडल ११, जीएसटी भवन, माझगाव, मुंबई), रा.ठी:- मनकॉस्ट कॉ.ऑप. सोसायटी फ्लॅट नंबर अे/१३०४, प्लॉट नंबर २७, सेक्टर १५, बेलापुर, नवी मुंबई. (मोबाईल क्रमांक ७५१७७८७६५१.)

---

मी वरीलप्रमाणे असुन वर नमुद पत्त्यावर माझे कुटुंबियासह रहावयास आहे. मी सहाय्यक विक्रीकर आयुक्त असुन माझी नेमणुक कार्यालय प्रमुख म्हणुन राज्यकर सहआयुक्त कार्यालय, नोडल-११ (घाटकोपर विभाग), जीएसटी भवन, माझगाव, मुंबई येथे आहे.

जीएसटी विभागाची इन्व्हेस्टीगेशन शाखाचे सन २०२०-२१ च्या नियमित तपासणी दरम्यान MUM-BCP-C- 20 आणि MUM-BCP-C- 26 घाटकोपर विभाग, नोडल ११, माझगाव, मुंबई या ठिकाणी नेमणुक असलेले अधिकारी श्री. अमित लाळगे यांचेकडुन अपात्र परतावा मंजुर करून करदात्यांना वितरीत झाल्याचे निदर्शनास आल्याने जीएसटी विभागामार्फत त्याबाबत राज्यकर आयुक्त, मुंबई, महाराष्ट्र राज्य यांना अहवाल सादर करण्यात आला होता. सदर अहवालाचे अनुषंगाने विशेष राज्यकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई याचे कार्यालयीन आदेश क्र एएमी./गोप./आस्था.-०७/इतिवृत्तांत/जी.-२, दि. २२/०८/२०२३ चे पत्रान्वये राज्यकर सहआयुक्त, नोडल-११, माझगाव, मुंबई यांना श्री. अमित लाळगे, राज्यकर अधिकारी यांचेविरोधात करदात्यांना अपात्र परतावा दिल्याने फौजदारी कारवाई करण्याबाबत निर्देशित करण्यात आले आहे. त्या अनुषंगाने राज्यकर सहआयुक्त, नोडल ११, माझगाव यांचे पत्र क्र.रासआ./नो.-११/गोप./श्री.अमित लाळगे/रा.अधिकारी/२०२३-२४/ब-५३ मुंबई, दि.२४/०८/२०२३ अन्वये श्री संजय टेकाडे, सहाय्यक विक्रीकर आयुक्त,कार्यालय प्रमुख, नोडल ११, माझगाव,मुंबई यांना श्री. अमित लाळगे, राज्यकर अधिकारी यांचेविरोधात बनावट करदात्यांना अपात्र परतावा दिल्याने फौजदारी कारवाई करण्याबाबत प्राधिकृत केले आहे.

सदर निर्देशाप्रमाणे मी दिनांक ०५/०९/२०२३ रोजी सहपोलीस आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, मुंबई यांना श्री. अमित लाळगे, राज्यकर अधिकारी यांचेविरोधात शासनाची फसवणुक व बनावट करदात्यांना अपात्र परतावा मंजुर करून तो पारीत करून गैरव्यवहार केलेबाबत गुन्हा नोंद करण्याबाबत अर्ज सादर केला होता. सदर अर्ज हा पुढील चौकशीकामी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,वरळी, मुंबई येथे वर्ग करण्यात आला होता. सदर तक्रारीच्या अनुषंगाने मी श्री. अमित लाळगे, राज्यकर अधिकारी यांनी केलेल्या गैरव्यवहारबाबतची तक्रार खालीलप्रमाणे देत आहे.

श्री. अमित लाळगे, राज्यकर अधिकारी, यांनी MUM-BCP-C-20 आणि MUM-BCP-C-26 (घाटकोपर विभाग), नोडल ११, माझगाव, मुंबई येथे नेमणूकी दरम्यान माहे ऑगस्ट २०२१ ते मार्च २०२२ या कालावधीमध्ये १६ करदात्यांना अपात्र करपरतावा वितरित करून शासनाची आर्थिक फसवणुक केली म्हणुन मा. राज्यकर आयुक्त, माझगाव, मुंबई, महाराष्ट्र राज्य, यांचे आदेश क्र. राआ/म.रा./चौकशी समीती/२०२२ -२०२३ / ब-३३, मुंबई, दिनांक ०६/०४/२०२२ अन्वये खालीलप्रमाणे चौकशी समिती स्थापन करण्यात आली होती.

समक्ष,

(मार्नसिंग वधकल),
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.

सहाय्यक राज्यकर आयुक्त
कार्यालय प्रमुख
सिमा तपासणी नाके
नोडल विभाग-११, मुंबई.

Scanned with OKEN Scanner

| अ. क्र. | पदनाम | अधिका-याचे नाव | अधिका-याची नियुक्ती |
|---|---|---|---|
| १) | चेअरमन | श्री गोविंद वसंत बिलोलीकर | अतिरीक्त राज्यकर आयुक्त, ठाणे विभाग. |
| २) | सदस्य | श्रीआप्पासाहेब सोनाजी गोरडे | राज्यकर सहआयुक्त, नोडल -०१, मुंबई. |
| ३) | सदस्य | श्री संजय किसनराव कंधारे | राज्यकर उपआयुक्त, दक्षता, मुंबई. |
| ४) | सदस्य | श्री मदन रामदास दराडे | महा. राज्यकर आयुक्त, हेडक्वार्टर-१,मुंबई. |

मा.राज्यकर आयुक्त, माझगाव, मुंबई, महाराष्ट्र राज्य यांना सदर समितीने पत्र क्रमांक:- रिपोर्ट/इन्काईरी रिफंड /बी.०५, मुंबई, दिनांक २०/०४/२०२२ अन्वये श्री.अमित लाळगे, राज्यकर अधिकारी यांनी केलेल्या गैरव्यवहाराबाबतचा प्रकरण निहाय चौकशी अहवाल सादर केला आहे.

लोकसेवक श्री. अमित लाळगे, राज्यकर अधिकारी यांनी जीएसटी विभागातील परीपत्रकातील नियमांचे उल्लंघन करून परतावा मंजुर करण्यासाठीची मार्गदर्शक तत्वांचे पालन न करता खालील वर्णण केलेल्या १६ बोगस दावेदारांना एकुण रूपये १७५,९३,१२,६२२/- अपात्र परतावा मंजूर करून वितरीत केले.

| अ.क | दावेदार करदाते | जीएसटीएन क्रमांक | प्रोपा/डायरेक्टर /भागीदार | परतावा रक्कम रूपयांत |
|---|---|---|---|---|
| १) | मे. लिबर्टी ट्रेडर्स | 27BETPC5060E1ZJ | वाहीद एच चौधरी | २८,२५,५२६९६/- |
| २) | मे.एम.के. फॅशन एक्पो | 27EUDPS4833L1Z1 | झबीउररेहमान कमरूददीन सलमानी | २६,०८,१०,६५८/- |
| ३) | मे.ट्रेडमेट एक्सपोर्ट अँन्ड मार्केटींग (ओपीसी) प्राय. लि. | 27AAICT9139N1ZI | दिपक के सेजवाळ | २०,१७,१०,३४४/- |
| ४) | मे.टेक्नोटीप मार्के. (ओपीसी) प्राय. लि. | 27AAICT2663H1Z4 | मेहमद अखलाक झिआउददीन अन्सारी | १९,९६,१७,७२४/- |
| ५) | मे.आउटसोर्स ऑप्टीमायझेशन (ओपीसी)प्राय. लि. | 27AADCO3999A1ZB | रेहमत अली मोमीन | १९,५४,७०,४०४/- |
| ६) | मे.लिंकपार्क इन्फ्रा. (ओपीसी) प्रा.लि. | 27AAECL6357J1Z4 | आवेश अब्दुलगनी मनयार | १३,७१,६८,०६८/- |
| ७) | मे.बिल्डनेट एक्सपोर्ट अँन्ड मार्केटींग (ओपीसी) प्रा. लि. | 27AAKCB2155J1ZK | दिलीप दत्तात्रय साळुंखे | १३,४६,९८,७४४/- |
| ८) | मे.फ्लोविज मार्केटींग (ओपीसी) प्रा.लि. | 27AAECF3530H1ZU | रेहमत अली मोमीन | ७,६५,७८,४१६/- |

समक्ष,

(मानसिंग वचकल),
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.

सहाय्यक राज्यकर आयुक्त
कार्यालय प्रमुख
सिमा तपासणी नाके
नोडल विभाग-११, मुंबई.

Scanned with OKEN Scanner

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ९) | मे.ईशन स्क्वेअर सोल्युशन | 27BQMPR6313Q1ZZ | रमेश काशीनाथ राउत | ६,२१,९९,४६४/- |
| १०) | मे. श्री बालाजी ट्रेडर्स | 27EBOPS6093C1Z4 | रोहीत सुनिल सोनकर | २,९९,९५,५१८/- |
| ११) | मे.कर्ष्ट्रअल ओवरसीस | 27 EKVPK3191R1ZY | विकास शंकरलाल कुमावत | २,८०,९५,११२/- |
| १२) | मे.इशीक फॅशनन्स | 27BSTPL3940G1ZA | अजयकुमार रामप्रित निशाद | ८,६०,७१,२१४/- |
| १३) | मे.स्लॅडस्टोन | 27EUYPR9731M1Z8 | राजू शेख | २,३०,१८,६७४/- |
| १४) | मे.ओनेक्स एंटरप्रायझेस | 27DAWPP6159Q1ZA | सुजान पंडीत | १,३४,११,२४६/- |
| १५) | मे.डेलमुन एंटरप्रायझेस | 27EDNPM8636Q1ZD | दानिश निशार मलिक | १,६४,२४,६३६/- |
| १६) | मे.ओनिक्स ट्रेडलिंक | 27AMMPA8655P1ZA | समीर सफिक अहमद | १,१३,२१,६४४/- |
| | एकुण रूपये.... | | | १७५,९३,१२,६२२/- |

जीएसटी करदात्याकडुन परतावा अर्ज हे जीएसटी पोर्टलवर सादर झाल्यावर सदरच्या परतावा मंजुर करण्यापुर्वी श्री. अमित लाळगे,विक्रीकर अधिकारी यांनी सदर दाव्याबाबत परतावा प्रकीया फाईल, अॅनिक्सचर-अ व अॅनिक्सचर-ड मधील माहीती, परतावा अर्जदार ट्रेडर्स यांनी पहील्यांदा परताव्यासाठी अर्ज केला किंवा कसे? याची माहीती घेणे, नोंदणी रेकॉर्ड मध्ये नमुद केलेली मालाची यादी व प्रत्यक्ष निर्यात केलेला माल हा एकच आहे का? हे पाहणे, आवक पुरवठा बील व जावक पुरवठा बील रेकॉर्डवर ठेवणे, सदरबाबीची शहानिशा करून करपरतावा मंजुर किंवा नामंजुर करणे हे अपेक्षित आहे.

लोकसेवक श्री.अमित लाळगे, विक्रीकर अधिकारी यांनी केलेल्या गैरव्यवहाराबाबत प्रकरणनिहाय माहीती खालीलप्रमाणे:-

**१) मेसर्स लिबर्टी ट्रेडर्स:-**

| अ. क्र. | तपशील | माहीती |
|---|---|---|
| १) | करदात्याचे नाव | मेसर्स लिबर्टी ट्रेडर्स |
| २) | जीएसटी क्रमांक | 27BETPC5060E1ZJ |
| ३) | व्यवसायाचे ठिकाण | ऑफिस ०८,निलकांत शॉपिंग सेंटर को.ही. सोसा, कामा लेन रोड, घाटकोपर, मुंबई. |
| ४) | प्रोपरायटरचे नाव | वहीद एच. चौधरी. |
| ५) | नोंदणीसाठी अर्ज केल्याची तारीख | ०५/०८/२०२०. |
| ६) | नोंदणी मंजुर झालेची तारीख | ०८/०८/२०२०. |
| ७) | बँकेचे नाव व खाते क्रमांक | State Bank of Indai, A/C No. 40736310076 |

समक्ष,

(मानसिंग वचकल),
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.

सहाय्यक राज्यकर आयुक्त
कार्यालय प्रमुख
सिमा तपासणी नाके
मोहीम विभाग - १९, मुंबई.

Scanned with OKEN Scanner

मेसर्स लिबर्टी ट्रेडर्स यांनी दिनांक २७/०१/२०२२ रोजी सप्टेंबर-२०२० ते ऑक्टोबर-२०२० या कालावधीचा "LUT" [letter of undertaking] या करपरतावा प्रकारातील परताव्याकरीता रूपये ३,७४,०१,०००/- चा एक परतावा अर्ज तसेच "IDS" [inverted duty structure] या परतावा प्रकारातील परताव्याकरीता १) दि. ०८/०२/२०२२ रोजी नोव्हेंबर-२०२१ ते डिसेंबर-२०२१ या कालावधीचे एकुण रूपये १०,०३,०३,०८६/- चे दोन परतावा अर्ज, तर २) दिनांक २०/०२/२०२२ रोजी जानेवारी-२०२२ या कालावधीकरीता रूपये १४,४८,४८,६१०/- चा एक करपरतावा अर्ज असे एकुण रूपये २८,२५,५२,६९६/- करीता चार परतावा अर्ज जीएसटी पोर्टलवर सादर केले होते.

जीएसटी करपरतावा कार्यपद्धती नुसार रूपये १,००,०००/- वरील व्यवहाराकरीता ई-वे पोर्टलवर ई-वे बील दाखविणे बंधनकारक आहे. मेसर्स लिबर्टी ट्रेडर्स ने त्यांचे रीटर्न फाईलमध्ये GSTR-2A नुसार खरेदी (Inward Supply) रूपये २५६,६२,७१,४३१/- आणि GSTR-3B नुसार विक्री (Outward supply) रूपये २०३,८३,२७,५५७/- दाखविलेले आहे. तर त्याचे आवक पुरवठा बिले व जावक पुरवठा बिले हे ई-वे बिल पोर्टलवर शुन्य दाखविण्यात आले. यावरून असे निर्दशनास येते की, सदर व्यापार हा खोटा आहे व सदर परतावा अर्ज हा शासनाची फसवणुक करण्यासाठी केला आहे. सदर परतावा हा वरील नोंदीवरून बनावट असल्याचे परतावा मंजुर करणारे श्री. लाळगे यांना माहीत असतानाही त्यांनी जाणुनबुजुन दुर्लक्ष करून परतावा मंजुर करून वितरीत केले.

मेसर्स लिबर्टी ट्रेडर्स यांना माल सप्लाय करणा-या कंपन्याचे ITC [Input tax credit] हे BO [Back Office] System मध्ये शुन्य दिसत असतानाही, तसेच सप्लॉय कंपनीचे जीएसटीएन रजिस्ट्रेशन रद्द झाले दिसत असतानाही, मेसर्स लिबर्टी ट्रेडर्स यांना आयटीसीचा फायदा देता येत नसतानाही जाणुनबुजुन श्री. अमित लाळगे यांनी मेसर्स लिबर्टी यांना परतावा मंजुर करून वितरीत केले.

वरील सर्व बाबीवरून स्पष्ट होते की, श्री. अमित लाळगे यांनी मेसर्स लिबर्टी ट्रेडर्स यांना टॅक्स डिमांड काढण्याऐवजी त्यांचेशी संगनमत करून अपात्र करपरतावा असताना त्यांना परतावा मंजुर करून वितरीत केले.

२) मेसर्स एस.के.फॅशन ट्रेडर्स:-

| अ.क्र. | तपशील | माहीती |
|---|---|---|
| १) | करदात्याचे नाव | मेसर्स एस के फॅशन ट्रेडर्स |
| २) | जीएसटी क्रमांक | 27EUDPS4833L1Z1 |
| ३) | व्यवसायाचे ठिकाण | ऑफिस नंबर ७०६ बी, स्वस्तीक दिशा कॉर्पोरेट पार्क, एलबीएस मार्ग, कोहीनुर कंपाउड ,घाटकोपर (पश्चिम),मुंबई. |
| ४) | प्रोपरायटर चे नाव | झबीउररहमान कम रूददीन सलमानी. |
| ५) | नोंदणीसाठी अर्ज केल्याची तारीख | १४/०२/२०२१. |
| ६) | नोंदणी मंजुर झालेची तारीख | १८/०२/२०२१. |
| ७) | बॅंकेचे नाव व खाते क्रमांक | Axis Indai, A/C No. 921020043558495 |

समक्ष,

(मानसिंग वचकल),
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.

सहाय्यक राज्यकर आयुक्त
कार्यालय प्रमुख
सिमा तपासणी नाके
नोडल विभाग - ११, मुंबई

Scanned with OKEN Scanner

मेसर्स एस के फॅशन ट्रेडर्स यांनी दिनांक २१/११/२०२१ रोजी मार्च २०२१ ते सप्टेंबर २०२१ या कालावधीचा LUT [Letter of Undertaking] या करपरतावा प्रकारातील परताव्याकरीता रूपये १,२७,६३,७९०/- चा एक परतावा अर्ज, तसेच IDS [inverted duty structure] या परतावा प्रकारातील परताव्याकरीता १) दिनांक ०६/०२/२०२२ रोजी डिसेंबर-२०२१ या कालावधीचे एकुण रूपये ४,७५,५३,१२०/- व २) दिनांक ०३/०३/२०२२ रोजी फेब्रुवारी-२०२२ या कालावधीकरीता रूपये २०,०४,९३,७४८/- असे दोन करपरतावा अर्ज असे एकुण रूपये २६,०८,१०,६५८/- करीता तीन परतावा अर्ज जीएसटी पोर्टलवर सादर केले होते.

मेसर्स एस. के. फॅशन ट्रेडर्स यांनी रूपये ४,७५,५३,१२०/- चे परताव्या करीता यापुर्वी दिनांक २१/०१/२०२२ रोजी ARN क्र.AA270122116233W अन्वये अर्ज केला होता. सदर अर्जाबाबत दिनांक २४/०१/२०२२ श्री. अमित लाळगे यांनी मेसर्स एस के फॅशन ट्रेडर्स यांना **"कारणे दाखवा"** नोटीस काढुन परताव्या बाबतचे कागदपत्रे पुराव्यासह दिनांक ०८/०२/२०२२ रोजी हजर राहणेबाबत आदेशित केले होते. परंतु तत्पुर्वी दि. ०४/०२/२०२२ रोजी श्री. अमित लाळगे यांनी सदर परतावा अर्ज हा **" डिलर हे सदर परतावा अर्ज मागे घेत आहे"** हे कारण देवुन अर्ज नामंजुर म्हणुन आदेशित केला होता. त्यानंतर दिनांक ०६/०२/२०२२ रोजी मेसर्स एस. के. फॅशन ट्रेडर्स यांनी नमुद नामंजुर अर्जावर अपिल न करता IDS [inverted duty structure] हा करपरतावा प्रकार अर्जात नोंद न करता त्याऐवजी **"any other"** हा करपरतावा नमुद करून त्याच रक्कम व कालावधीकरीता नव्याने अर्ज केला होता व सदर अर्जावरून श्री. अमित लाळगे यांनी मेसर्स एस.के. फॅशन ट्रेडर्स यांनी रूपये ४,७५,५३,१२०/- चा परतावा मंजुर करून वितरीत केले.

मेसर्स एस के फॅशन ट्रेडर्स यांनी मेसर्स हिलीबीली बिझनेस व मेसर्स इंटर क्रिब यांना रूपये १६०,४४,५९,५९१/- च्या मालाची विक्री केलेबाबत रीटर्न फाईलमध्ये नमुद केले आहे. परंतु मेसर्स हिलीबीली बिझनेस व मेसर्स इंटर क्रिब यांनी नोटीफिकेशन क्रमांक ४०/२०१७ स्टेट टॅक्स मध्ये नमुद प्रमाणे कोणतीही निर्यात केली नसल्याने मेसर्स एस.के.फॅशन ट्रेडर्स ही IDS [inverted duty structure] परतावा प्रकारात परतावा घेण्यास अपात्र होती. त्यामुळेच परतावा प्रक्रिया फाईलमध्ये निर्याती संदर्भातील कोणतही कागदपत्रे दिसुन येत नाहीत.

तसेच मेसर्स एस.के.फॅशन ट्रेडर्स यांनी Inword supply (खरेदी) वरचा ITC [Inword Credit Tax] मेसर्स डेलमॉन एंटरप्रायझेस यांचा मार्च-२०२१ ते सप्टेंबर-२०२१ रोजीचा रूपये १,२७,६३,७९१/-, मेसर्स ब्लु बेल क्रिएशन यांचा डिसेंबर-२०२१ या कालावधीचा रूपये ५,६३,२४,९८९/-, मेसर्स मोटेक ट्रेडर्स यांचा फेब्रुवारी-२०२२ चा रूपये २०,१६,२७,९०६/- असा परतावा मिळणेबाबत अर्जात दावा केला आहे. परंतु मेसर्स डेलमॉन एंटरप्रायझेस यांनी त्याचे सप्लायरचा ITC घेतला असल्याने मेसर्स डेलमॉन यांचेकडे मेसर्स एस.के. फॅशन ट्रेडर्स यांना देण्यासाठी कोणताही ITC शिल्लक नाही. तसेच मेसर्स ब्लु बेल क्रिएशन यांनी डिसेंबर-२०२१ मध्ये कोणताही खरेदी केली नाही. त्यामुळे मेसर्स एस.के. फॅशन ट्रेडर्स यांनी ब्लु बेल क्रिएशन कडील ITC चा दावा श्री. लाळगे यांनी नामंजुर करायला हवा होता. तर मेसर्स मोटेक ट्रेडर्स यांचेकडे ITC रूपये २,१२,०११/- शिल्लक असताना मेसर्स एस.के. फॅशन ट्रेडर्स यांनी रूपये २०,१६,२७,९०६/- परतावा दावा केला आहे. ही वस्तुस्थिती

समक्ष,

( मानसिंग वचकल),
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.

सहाय्यक राज्यकर आयुक्त
कार्यालय प्रमुख
सिमा तपासणी नाके
भौडल विभाग-११, मुंबई.

Scanned with OKEN Scanner

असतानाही श्री. अमित लाळगे यांनी BO [back office] system ने दर्शविलेल्या सुचनांकडे दुर्लक्ष करून परतावा मंजुर करून दिला.

**३) मे.ट्रेडसेट एक्सपोर्ट अँन्ड मार्केटींग (ओपीसी) प्राय. लि.:-**

| अ.क्र. | तपशील | माहिती |
|---|---|---|
| १) | करदात्याचे नाव | मे.ट्रेडसेट एक्सपोर्ट अँन्ड मार्केटींग (ओपीसी) प्राय. लि. |
| २) | जीएसटी क्रमांक | 27AAICT9139N1ZI |
| ३) | व्यवसायाचे ठिकाण | ऑफिस नंबर ७०६ बी, स्वस्तीक दिक्षा कॉर्पोरेट पार्क, एलबीएस मार्ग, कोहीनुर कंपाउड ,घाटकोपर (पश्चिम), मुंबई. |
| ४) | प्रोपारायटर चे नाव | दिपक के सेजवळ. |
| ५) | नोंदणीसाठी अर्ज केल्याची तारीख | १४/१०/२०२१. |
| ६) | नोंदणी मंजुर झालेची तारीख | २६/१०/२०२१. |
| ७) | बँकेचे नाव व खाते क्रमांक | Axis Indai, A/C No. 921020045730423. |

मेसर्स ट्रेडसेट यांनी दिनांक ०९/०३/२०२२ रोजी फेब्रुवारी-२०२२ या कालावधीचा IDS [inverted duty structure] या परतावा प्रकारातील परताव्याकरीता एकुण रूपये २०,१७,९०,३४४/- करीता एक परतावा अर्ज जीएसटी पोर्टलवर सादर केला होता.

मेसर्स ट्रेडसेट यांनी नमुद परतावा अर्जात व्यवसायाचे ठिकाण हे ऑफिस नंबर ७०६ बी, स्वस्तीक दिक्षा कॉर्पोरेट पार्क, एलबीएस मार्ग, कोहीनुर कंपाऊड, घाटकोपर (पश्चिम), मुंबई असे नमुद केलेले आहे. परंतु सदर पत्ता इतर ६ करदात्यांनी त्याचे व्यवसायाचे ठिकाण दर्शविलेले आहेत. त्या ६ करदात्याचा परतावा हा श्री. अमित लाळगे यांनीच मंजुर केला आहे. म्हणजेच श्री. लाळगे यांना सदर व्यवसाय ठिकाण इतर करदात्यांनी अर्जात दाखविले आहेत म्हणजेच सदर करदाते हे बनावट आहेत हे माहीती असताना त्याकडे जाणुनबुजुन दुर्लक्ष केले आहे.

मेसर्स ट्रेडसेट यांनी मेसर्स हिलीबीली बिझनेस व मेसर्स इंटर किब यांना रूपये ११५,१३,३१,१०३/- चा आऊटवर्ड सप्लाय केलेबाबत रीटर्न फाईलमध्ये नमुद केले आहे. परंतु मेसर्स हिलीबीली बिझनेस व मेसर्स इंटर किब यांनी नोटीफिकेशन क्रमांक ४०/२०१७ स्टेट टॅक्स मध्ये नमुद केल्याप्रमाणे कोणतीही निर्यात केली नसल्याने मेसर्स ट्रेडसेट ही IDS [inverted duty structure],या परतावा प्रकारात परतावा घेण्यास अपात्र होती. तसेच परतावा प्रकिया फाईलमध्ये निर्याती संदर्भातील कोणतही कागदपत्रे दिसुन येत नाही.

**४) मे.टेक्नोटीप मार्के. (ओपीसी) प्राय. लि.**

| अ. क्र. | तपशील | माहिती |
|---|---|---|
| १) | करदात्याचे नाव | मे.टेक्नोटीप मार्के. (ओपीसी) प्राय. लि. |
| २) | जीएसटी क्रमांक | 27AAICT2663H1Z4 |
| ३) | व्यवसायाचे ठिकाण | ऑफिस ०८,निलकांत शॉपिंग सेंटर कॉ.ही. सोसा कामा लेन रोड, घाटकोपर, मुंबई. |

समक्ष,

( मानसिंग वचकल),
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.

सहाय्यक राज्यकर आयुक्त
कार्यालय प्रमुख
सिमा तपासणी नाके
नोडल विभाग-११, मुंबई.

Scanned with OKEN Scanner

| | | |
|---|---|---|
| ४) | प्रोपारायटर चे नाव | मोहम्मद अखलाक झियाउद्दीन अन्सारी |
| ५) | नोंदणीसाठी अर्ज केल्याची तारीख | २५/१२/२०२० |
| ६) | नोंदणी मंजुर झालेची तारीख | ०१/०१/२०२१ |
| ७) | बँकेचे नाव व खाते क्रमांक | Bank of Baroda, A/C No. 13780200001517 |

मे.टेक्नोटीप मार्के. (ओपीसी) प्राय.,लि.यांनी LUT [letter of undertaking] या करपरतावा प्रकारातील परताव्याकरीता १) दिनांक १७/०७/२०२१ जानेवारी-२०२१ ते मार्च-२०२१ या कालवधीकरीता रूपये ४२,१३,०४४/- चा एक परतावा अर्ज, २) एप्रिल-२०२१ या कालावधीकरीता रूपये १,३३,८१,२७६/- चा एक परतावा अर्ज, मे-२०२१ या कालावधीकरीता रूपये ६६,२७०/- चा एक परतावा अर्ज, ३) दिनांक ०६/०९/२०२१ रोजी जुन-२०२१ या कालावधीकरीता रूपये १,३२,३६०/- चा एक परतावा अर्ज, ४) जुलै-२०२१ ते ऑगस्ट २०२१ या कालावधीकरीता रूपये १,३२,३६०/- चा एक परतावा अर्ज, तसेच IDS [inverted duty structure] या परतावा प्रकारातील परताव्याकरीता ५) दिनांक ०२/१२/२०२१ रोजी ऑगस्ट-२०२१ ते ऑक्टोबर-२०२१ या कालावधीचे एकुण रूपये ४,४६,०५,२०२/- व ६) दिनांक ०३/०३/२०२२ रोजी फेब्रुवारी-२०२२ या कालावधीकरीता रूपये २०,०४,९३,७४८/- चा एक करपरतावा अर्ज, ७) दिनांक २०/०२/२०२२ रोजी जानेवारी- २०२२ या कालावधीकरीता रूपये १३,७१,०२,४८६/- चा एक परतावा अर्ज, असे एकुण रूपये १९,९६,१७,७२४/- चे एकुण ७ परतावा अर्ज जीएसटी पोर्टलवर सादर केले होते.

मे.टेक्नोटीप यांनी रीटर्न फाईलच्या नोंदीवरून मालाची विक्री Outward zero rated supply ( निर्यात) व निर्यातदारास विक्री असे दोन प्रकारे केली आहे. श्री. अमित लाळगे यांनी मेसर्स टेक्नोटीप यांनी माल निर्यात केल्याने परकीय चलन मिळाल्याबाबत फॉरेन इनवर्ड रीमीटन्स सर्टीफिकेट हे परतावा फाईलमध्ये अभिलेखावर ठेवणे आवश्यक असताना त्याची नोंद घेतली नाही.

मे.टेक्नोटीप यांनी मेसर्स हिलीबीली बिझनेस, मेसर्स इंटर क्वि व मेसर्स फ्लॉयनिच यांना आऊटवर्ड सप्लाय केलेबाबत रीटर्न फाईलमध्ये नमुद केले आहे. परंतु मेसर्स हिलीबीली बिझनेस ,मेसर्स इंटर क्वि व मेसर्स फ्लॉयनिच यांनी नोटीफिकेशन कमांक ४०/२०१७ स्टेट टॅक्स मध्ये नमुद केल्याप्रमाणे कोणतीही निर्यात केली नसल्याने मे. टेक्नोटीप ही IDS [inverted duty structure] परतावा प्रकारात परतावा घेण्यास अपात्र होती. तरीही श्री. अमित लाळगे यांनी वरील बाबींकडे दुर्लक्ष करून जाणुनबजुन मे.टेक्नोटीप यांना परतावा मंजुर करून वितरीत केले आहे.

**५ ) मे.आउटसोर्स ऑप्टीमायझेशन ओपीसी प्राय. लि.**

| अ.क्र. | तपशील | माहीती |
|---|---|---|
| १) | करदात्याचे नाव | मे.आउटसोर्स ऑप्टीमायझेशन (ओपीसी) प्राय. लि |
| २) | जीएसटी कमांक | 27AADCO3999A1ZB |
| ३) | व्यवसायाचे ठिकाण | ऑफिस ०८,निलकांत शॉपिंग सेंटर कॉ.ही. सोसा कामा लेन रोड, घाटकोपर, मुंबई. |

समक्ष,

( मानसिंग वचकल),
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.

सहाय्यक राज्यकर आयुक्त
कार्यालय प्रमुख
सिमा तपासणी नाके
नोडल विभाग-११, मुंबई.

Scanned with OKEN Scanner

| | | |
|---|---|---|
| ४) | प्रोपायटर चे नाव | रहमत अली मोमीन. |
| ५) | नोंदणीसाठी अर्ज केल्याची तारीख | २९/०९/२०२१. |
| ६) | नोंदणी मंजुर झालेची तारीख | ०१/१०/२०२१. |
| ७) | बँकेचे नाव व खाते क्रमांक | IDFC First Bank LTD. A/C No. 10078206779. |

मे.आउटसोर्स ऑप्टीमायझेशन यांनी IDS [inverted duty structure] या परतावा प्रकारातील परताव्याकरीता १) दिनांक १०/०१/२०२२ रोजी नोव्हेंबर-२०२१ या कालावधीचे रूपये ९,९५,२९२/- चा एकपरतावा अर्ज, २) दि. २६/०१/२०२२ रोजी डिसेंबर २०२१ या कालावधीकरीता रूपये ४,९९,३५,६००/- चा एक करपरतावा अर्ज, ३) दिनांक २०/०२/२०२२ रोजी जानेवारी-२०२२ या कालावधीकरीता रूपये १४,४५,३९,५१२/- चा एक परतावा अर्ज असे एकुण रूपये १९,५४,७०,४०४/- चा एक परतावा अर्ज असे एकुण ३ परतावा अर्ज जीएसटी पोर्टलवर सादर केले होते.

मे.आउटसोर्स ऑप्टीमायझेशन यांनी मेसर्स मोटेक व मेसर्स सालवे यांचेकडुन माल खरेदी केलेबाबत रीटर्न फाईलमध्ये नमुद केले आहे. मे.आउटसोर्स ऑप्टीमायझेशन यांनी मेसर्स मोटेक यांचेकडील १४,५३,७२५७८/- रूपये व मेसर्स साळवे यांचेकडील ६,०८,६०,८७०/- रूपयाचे ITC वर दावा केला आहे. परंतु मेसर्स मोटेक यांनी पॅनफ्लॉवर डिजीटल मार्केटींग ओपीसी प्राय. लि व रीजेन्सी टेक्सटाईल यांचेकडुन ITC वर दावा केला आहे. परंतु सदरपैकी रीजेन्सी टेक्सटाईल यांनी काहीही कर भरणा केला नसुन त्यांचा ITC शुन्य असुन रीजेन्सी टेक्सटाईल नोंदणी दाखला नोंदणी दिनांकापासुन रद्द केलेला आहे. तसेच मेसर्स मोटेक यांचा नोंदणी दाखला दि ०५/०८/२०२१ पासुन सुमोटु रद्द केला आहे. अश्याप्रकारे मे.आउटसोर्स ऑप्टीमायझेशन याने मेसर्स मोटेक टेडर्स यांचेकडुन इनपुट टॅक्स क्रेडीट रूपये १४,५३,५२,५७८/- हा अपात्र असताना घेतलेला आहे.

मे.आउटसोर्स ऑप्टीमायझेशन यांनी जीएसटी रीटर्न फार्म GSTR-3B नूसार रूपये १३५,५०,३१,९४२/- ची मालाची विक्री केली असुन त्यांचे ई-वे बील २,१०,३८,३३८/- रूपये हे विक्रीचे प्रमाणात अत्यल्प दिसुन येत आहे. तसेच जीएसटी रीटर्न फार्म GSTR -2A नूसार रूपये १५७,५८,७७,३९२/- मालाची खरेदी केली आहे. परंतु त्यांची ई-वे बील रूपये १,१८,४७,३६०/-चे दिसुन येत आहे. याचा अर्थ अत्यल्प प्रमाणात मालाची देवाण-घेवाण झालेली आहे. परंतु दावा केलेला परतावा मोठ्या रक्कमेचा आहे.

तरीही अश्याप्रकारे श्री. अमित लाळगे यांनी मे.आउटसोर्स ऑप्टीमायझेशन यांनी सादर केलेल्या परतावा अर्जातील अपात्र असणारा रूपये १९,५४,७०,४०४/- परतावा मंजुर करून वितरीत केले.

६ ) मे.लिंकपार्क इंन्फ्रा. (ओपीसी) प्रा.लि.

| अ.क्र. | तपशील | माहीती |
|---|---|---|
| १) | करदात्याचे नाव | मे.लिंकपार्क इंन्फ्रा. (ओपीसी) प्रा.लि. |
| २) | जीएसटी क्रमांक | 27AAECL6357J1Z4 |
| ३) | व्यवसायाचे ठिकाण | ऑफिस नंबर ७०६ बी, स्वस्तीक दिक्षा कॉर्पोरेट पार्क, एलबीएस मार्ग, कोहीनुर कंपाउंड ,घाटकोपर (पश्चिम), मुंबई. |

समक्ष,

( मानसिंग वचकल),
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.

सहाय्यक राज्यकर आयुक्त
कार्यालय प्रमुख
सिमा तपासणी नाके
नोडल विभाग-११, मुंबई.

Scanned with OKEN Scanner

| | | |
|---|---|---|
| ४) | प्रोपारायटर चे नाव | आवेश अब्दुलगनी मनीयार. |
| ५) | नोंदणीसाठी अर्ज केल्याची तारीख | ०९/०६/२०२१. |
| ६) | नोंदणी मंजुर झालेची तारीख | ११/०६/२०२१. |
| ७) | बँकेचे नाव व खाते क्रमांक | ICICI LTD., A/C No. 120705001106. |

मे.लिंकपार्क इंन्फ्रा.(ओपीसी) प्रा.लि. यांनी IDS [inverted duty structure], या परतावा प्रकारातील परताव्याकरीता दि २०/०२/२०२२ रोजी जानेवारी-२०२२ या कालावधीचे एकुण रूपये १३,७१,६८,०६८/- चा एक परतावा अर्ज जीएसटी पोर्टलवर सादर केला होता.

मे.लिंकपार्क इंन्फ्रा. यांनी मेसर्स मोटेक यांचेकडुन माल खरेदी केलेबाबत रीटर्न फाईलमध्ये नमुद केले आहे. मे.लिंकपार्क इंन्फ्रा. यांनी मेसर्स मोटेक यांचेकडील रूपये १३,७१,६८,०६८/- चा ITC वर दावा केला आहे. परंतु मेसर्स मोटेक यांनी पॅनफ्लॉयर डिजीटल मार्केटींग (ओपीसी) प्राय. लि व रीजेन्सी टेक्सटाईल यांचेकडुन ITC वर दावा केला आहे परंतु सदरपैकी रीजेन्सी टेक्सटाईल यांनी काहीही कर भरणा केला नसुन त्यांचा ITC शुन्य असुन रीजेन्सी टेक्सटाईल नोंदणी दाखला नोंदणी दिनांकापासुन रद्द केलेला आहे. तसेच मेसर्स मोटेक यांचा नोंदणी दाखला दि ०५/०८/२०२१ पासुन सु-मोटु रद्द केला आहे. अश्याप्रकारे मे.लिंकपार्क इंन्फ्रा. ओपीसी प्रा.लि. याने मेसर्स मोटेक टेडर्स यांचेकडुन आयटीसी ( इनपुट टॅक्स क्रेडीट ) रूपये १३,७१,६८,०६८/- चे बोगस व अपात्र असताना घेतलेला आहे.

मे.लिंकपार्क इंन्फ्रा. (ओपीसी.) प्रा.लि. यांनी जीएसटी रीटर्न फार्म GSTR-3B नुसार रूपये १५६,८८,५१,९९९/- ची मालाची विक्री केली असुन त्यांचे ई-वे बील ०/- रूपये आहे. तसेच जीएसटी रीटर्न फार्म GSTR -2A नूसार रूपये ९०,४३,५०,१०४/- मालाची खरेदी केली आहे. परंतु त्यांची ई-वे बील ०/- रूपये दिसुन येत आहे. याचा अर्थ कोणताही मालाची देवाण - घेवाण झालेली नाही.

सदर मे.लिंकपार्क इंन्फ्रा. (ओपीसी.) प्रा.लि. यांनी मालाची विक्री मर्चट एस्पार्टर्स मेसर्स इंटरक्रीब मार्केट ओपीसी प्राय लि., मेसर्स हिलीवीली बिझनेस ओपीसी प्राय लि. आणि मेसर्स रीजेन्सी टेक्सटाईल या निर्यातदार कंपन्यांना केलेबाबत रीटर्न फाईलमध्ये दाखविले आहे. सदर तीनही मर्चट एक्सपोर्टर यांचा नोंदणी दाखला (GSTN) रद्द किंवा निलंबित केलेले आहेत.

तरीही अश्याप्रकारे वरील सर्व त्रुटीवर जाणुनबुजुन दुर्लक्ष करून श्री. अमित लाळगे यांनी मे.लिंकपार्क इंन्फ्रा. (ओपीसी) प्रा.लि. यांनी सादर केलेल्या परतावा अर्जातील अपात्र असणारा रूपये १३,७१,६८,०६८/- परतावा मंजुर करून वितरीत केले.

**७ ) मे.बिल्डनेट एक्सपोर्ट ॲन्ड मार्केटींग (ओपीसी) प्रा. लि.**

| अ.क्र. | तपशील | माहिती |
|---|---|---|
| १) | करदात्याचे नाव | मे.बिल्डनेट एक्सपोर्ट ॲन्ड मार्केटींग (ओपीसी) प्रा. लि. |
| २) | जीएसटी क्रमांक | 27AAKCB2155J1ZK |

समक्ष,

( मानसिंग वचकल ),
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.

सहाय्यक राज्यकर आयुक्त
कार्यालय प्रमुख
सिमा तपासणी नाके
नोडल विभाग-११, मुंबई.

Scanned with OKEN Scanner

| | | |
|---|---|---|
| ३) | व्यवसायाचे ठिकाण | ऑफिस ०८, निलकांत शॉपिंग सेंटर कॉ.ही. सोसा कामा लेन रोड, घाटकोपर, मुंबई. |
| ४) | प्रोपायटर चे नाव | दिलीप दत्तात्रय साळुंखे |
| ५) | नोंदणीसाठी अर्ज केल्याची तारीख | २०/१०/२०२१. |
| ६) | नोंदणी मंजुर झालेची तारीख | २२/१०/२०२१. |
| ७) | बँकेचे नाव व खाते क्रमांक | Axis Bank, A/C No. 921020045765869. |

मे.बिल्डनेट एक्सपोर्ट अँन्ड मार्केटींग यांनी IDS [inverted duty structure] या परतावा प्रकारातील परताव्याकरीता १) दि ३०/१२/२०२१ रोजी ऑक्टोबर-२०२१ ते नोव्हेंबर-२०२१ या कालावधीचे एकुण रूपये ९,९९,५०६/- व २) दि २०/०२/२०२२ रोजी जानेवारी-२०२२ या कालावधीकरीता रूपये १३,३६,९९२३८/- चे असे एकुण रूपये १३,४६,९८,७४४/- चे एकुण २ परतावा अर्ज जीएसटी पोर्टलवर सादर केले होते.

मे.बिल्डनेट एक्सपोर्ट अँन्ड मार्केटींग यांनी मेसर्स मोटेक व मेसर्स सीपॉन एन्टरप्रायझेस यांचेकडुन माल खरेदी केलेबाबत BO system मध्ये दिसत आहे. मे.बिल्डनेट एक्सपोर्ट अँन्ड मार्केटींग यांनी मेसर्स मोटेक यांचेकडील १३,४४,८२,०७३/- रूपये ITC वर दावा केला आहे. तसेच मेसर्स मोटेक यांनी पॅनफ्लॉयर डिजीटल मार्केटींग ओपीसी प्राय. लि व रीजेन्सी टेक्सटाईल यांचेकडुन ITC वर दावा केला आहे परंतु सदरपैकी रीजेन्सी टेक्सटाईल यांनी काहीही कर भरणा केला नसुन त्यांचा ITC शुन्य असुन रीजेन्सी टेक्सटाईल यांचा नोंदणी दाखला नोंदणी दिनांकापासुन रद्द केलेला आहे. तसेच मेसर्स मोटेक यांचा नोंदणी दाखला दि ०५/०८/२०२१ पासुन सुमोटु रद्द केलेला आहे. अश्याप्रकारे मे.बिल्डनेट एक्सपोर्ट अँन्ड मार्केटींग याने मेसर्स मोटेक टेडर्स यांचेकडुन इनपुट टॅक्स क्रेडीट रूपये १३,४४,८२,०७२/- हे बोगस व अपात्र असताना घेतलेला आहे.

तसेच मे.बिल्डनेट एक्सपोर्ट अँन्ड मार्केटींग यांनी मेसर्स सीपॉन एन्टरप्रायझेस यांचेकडील २६,९६,९९१/- रूपये ITC वर दावा केला आहे. परंतु सीपॉन एन्टरप्रायझेस यांचा नोंदणी दाखला संबधित CGST कार्यालयाने निलंबित केला आहे. म्हणुन मे.बिल्डनेट एक्सपोर्ट अँन्ड मार्केटींग यांनी मेसर्स सीपॉन एन्टरप्रायझेस यांचेकडील रूपये २६,९६,९९१/- हे ITC वर केलेला दावा अपात्र आहे.

मे.बिल्डनेट एक्सपोर्ट अँन्ड मार्केटींग यांची विक्री मालाबाबत GSTR-3B नूसार ई-वे बिल हे रूपये १३५,४८,४५,९८७/- आवश्यक असताना फक्त रूपये २२,४६,९०,९२०/- चे ई-वे बिल उपलब्ध आहे. तसेच खरेदीबाबत GSTR-2A नूसार ई-वे बील रूपये ९०,६७,७६,६२१/- हे आवश्यक असताना फक्त रूपये शुन्य चे ई-वे बिल उपलब्ध आहे. जीएसटी परतावा कार्यपद्धती नुसार रूपये १,००,०००/- चे वरील व्यवहाराकरीता ई-वे बिल बंधनकारक आहे.

सदर मे.बिल्डनेट एक्सपोर्ट अँन्ड मार्केटींग यांनी मालाची विक्री मर्चट एक्सपोर्टर्स मेसर्स इंटरक्टीव मार्केट ओपीसी प्राय लि., मेसर्स हिलीबीली बिझनेस (ओपीसी.) प्राय लि. मेसर्स इडन स्क्वेअर सोल्युशन आणी मेसर्स प्लुटो

समक्ष,

(मानसिंग वचकल),
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.

शहायक राज्यकर आयुक्त
कार्यालय प्रमुख
सिमा तपासणी नाके
भोइल विभाग-११, मुंबई.

Scanned with OKEN Scanner

ट्रेडर्स टेक्सटाईल या निर्यातदार कंपन्यांना केलेबाबत परतावा अर्जात दाखविले आहे. सदर चारही मर्चंट एक्सपोर्टर यांचा नोंदणी दाखला GSTN ॲबइनिशओ रदद केलेले आहेत.

अश्याप्रकारे श्री अमित लाळगे यांनी मे.लिंकपार्क इंन्फा. (ओपीसी.) प्रा.लि. यांनी सादर केलेल्या परतावा अर्जातील, अपात्र असणारा एकुण रूपये १३,४६,९८,७४४/- परतावा मंजुर करून वितरीत केला.

८) मे.फ्लोवेज मार्केटींग ओपीसी प्रा.लि.

| अ.क्र. | तपशील | माहिती |
|---|---|---|
| १) | करदात्याचे नाव | मे.फ्लोवेज मार्केटींग (ओपीसी.) प्रा.लि |
| २) | जीएसटी क्रमांक | 27AAECF3530H1ZU |
| ३) | व्यवसायाचे ठिकाण | ऑफिस ०८,निलकांत शॉपिंग सेंटर कॉ.हौ. सोसा. कामा लेन रोड, घाटकोपर, मुंबई ४०० ०८६ |
| ४) | प्रोपरायटर चे नाव | रहमत अली मोमीन. |
| ५) | नोंदणीसाठी अर्ज केल्याची तारीख | २४/१२/२०२०. |
| ६) | नोंदणी मंजुर झालेची तारीख | १५/०१/२०२१. |
| ७) | बँकेचे नाव व खाते क्रमांक | Bank of Baroda, A/C No. 13780200001516. |

मे.फ्लोवेज मार्केटींग ओपीसी प्रा.लि यांनी LUT [letter of undertaking] या करपरतावा प्रकारातील परताव्याकरीता १) दि १७/०७/२०२१ जानेवारी २०२१ ते मार्च २०२१ या कालवधीकरीता रूपये २७,७२,३८८ चा एक परतावा अर्ज, २) एप्रिल-२०२१ या कालावधीकरीता रूपये १,०४,७४,६०४/- चा एक परतावा अर्ज, ३)मे- २०२१ या कालावधीकरीता रूपये ५१,०५,१०४/- चे एक परतावा अर्ज,तसेच IDS [inverted duty structure] या परतावा प्रकारातील परताव्याकरीता ४)दि. २७/०८/२०२१ रोजी जुन-२०२१ या कालावधीचा एकुण रूपये ४,४६,०५,२०२/- व ५)दि. ०९/१२/२०२२ रोजी सप्टेंबर-२०२१ या कालावधीकरीता रूपये १,७५,३८,३९६/- चा एक करपरतावा अर्ज, ६)ऑक्टोबर-२०२१ या कालावधीकरीता रूपये १,६२,०३,७७८/- चा एक परतावा अर्ज, ७)नोव्हेंबर-२०२१ या कालावधीकरीता रूपये १,६७,२७,०४८/- असे एकुण रूपये ७,६५,७८,४१६/- चे एकुण ७ परतावा अर्ज जीएसटी पोर्टलवर सादर केले होते.

